**<u>ठळक बातम्या</u>**

- जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रपती, प्रधानमंत्र्यांच्या शुभेच्छा

- देशाची चालू आर्थिक वर्षातली वस्तू आणि सेवा क्षेत्रातली निर्यात ८२० अब्ज डॉलरवर गेल्याची केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाची माहिती

- अमेरिकेत लॉस एंजेलिस इथे होणाऱ्या २०२८च्या ऑलिंपिक क्रीडा स्पर्धांमध्ये क्रिकेटचा समावेश होणार

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आजचा सामना रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु आणि दिल्ली कॅपिटल्समधे

**<><><><><>**

जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांची जयंती आज साजरी होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना महावीर जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान महावीर यांनी अहिंसा हाच सर्वोच्च धर्म असून अहिंसा परमो धर्माच्या संदेशाद्वारे मानवतेला एक नवीन मार्ग दाखवला असल्याचं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. भगवान महावीरांची शिकवणी आपल्याला एका करुणामय आणि सुसंवादी जगाकडे घेऊन जातात असं उपराष्ट्रपतींनी संदेशात म्हटलं आहे. भगवान महावीराचे आदर्श जगभरातल्या असंख्य लोकांना बळ देतात, असं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी जनतेला महावीर जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. हा दिवस तीर्थंकर भगवान महावीरांचं जीवन कार्य तसंच त्यांच्या अनेकांतवादाच्या शिकवणीचं स्मरण करून देतो, असं राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. भगवान महावीर यांची अहिंसा, सत्य आणि करुणेची शिकवण आपल्याला सतत मार्गदर्शन करते असं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे. भगवान महावीरांचे मानवकल्याणाचे विचार आचरणात आणण्याचा सर्वांनी प्रयत्न करुया, असं आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं आहे. भगवान महावीर यांनी आपल्याला सत्य आणि अहिंसेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा दिली, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांंनी म्हटलं आहे.

भगवान महावीर यांचं जन्मस्थान असलेल्या बिहारमधल्या वैशाली जिल्ह्यातल्या कुंडलपूरमध्ये शोभायात्रा, मस्तकाभिषेक आणि इतर धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. नालंदा इथंही पावापुरी मधल्या जैन मंदीरात जैन भाविक मोठ्या संख्येनं पूजाअर्चा करत आहेत.

**<><><><><>**

जागतिक होमिओपॅथी दिन आज साजरा केला जात आहे. होमिओपॅथी ही आरोग्य सेवेसाठी समग्र दृष्टिकोन ठेवणारी जगातील दुसरी - सर्वात मोठी वैद्यकीय प्रणाली असून, त्यातील नैसर्गिक पद्धतींमुळे लोक हे उपचार पसंत करतात. आयुष मंत्रालयाच्या मते, देशात १० कोटींहून अधिक लोक आरोग्याच्या गरजांसाठी होमिओपॅथीवर विश्वास ठेवतात. सध्या, देशात तीन लाख ४५ हजार नोंदणीकृत होमिओपॅथी डॉक्टर, २७७ रुग्णालयं, आठ हजारांहून अधिक दवाखाने आणि २७७ शैक्षणिक संस्था आहेत.

**<><><><><>**

देशाची चालू आर्थिक वर्षातली वस्तू आणि सेवा क्षेत्रातली निर्यात ८२० अब्ज डॉलरवर गेली आहे. ही निर्यात गेल्या वर्षीच्या याच कालावधीतल्या ७७८ अब्ज डॉलरपेक्षा ६ टक्के अधिक असल्याचं वाणिज्य मंत्रालयानं सांगितलं. वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्या उपस्थितीत झालेल्या निर्यात प्रोत्साहन परिषद आणि उद्योजकाच्या बैठकीत ही आकडेवारी समोर आली आहे.

**<><><><><>**

नवी दिल्लीत आज पासून ९ वे जागतिक तंत्रज्ञान संमेलन सुरु होत आहे. ४० देशातले दीडशेहून अधिक वक्ते या संमेलनात सहभागी होत आहेत. तीन दिवस चालणाऱ्या या संमेलनात एकूण ४० सत्रे होणार आहेत. या वर्षीच्या संमेलनाचा विषय संभावना अर्थात शक्यता असा असून यामध्ये तांत्रिक आव्हाने आणि संधींवर चर्चा होणार आहे. या संमेलनात मुख्य भाषण, मंत्रीस्तरीय चर्चा, तज्ञ समितीस्तरीय आणि राजकीय स्तरावरील चर्चा होणार आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं २६-११ मुंबईवरच्या दहशतवादी हल्ल्याचा आरोपी तहवूर राणा प्रकरणी नरेंदर मान यांची विशेष सरकारी वकील म्हणून नेमणूक केली आहे. ते तहवूर राणाच्या प्रकरणी न्यायालयात बाजू मांडणार आहेत. ही नेमणूक तीन वर्षांसाठी असेल, अशी माहिती गृहमंत्रालयानं दिली आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल स्लोवाकियाचे राष्ट्राध्यक्ष पिटर पेलेगिरी यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. या नेत्यांमध्ये दोन्ही देशांमधल्या विविध विषयावंर आणि आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक घडामोडींवर चर्चा झाली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सध्या दोन दिवसांच्या स्लोवाकियाच्या दौऱ्यावर असून दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी त्या स्लोवाकियाच्या परराष्ट्र मंत्रालयाला भेट देणार असून विविध कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत.

**<><><><>**

वक्फ सुधारणा कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर पुढच्या आठवड्यात सर्वोच्च न्यायालयात एकत्रित सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती के व्ही विश्वनाथन यांच्या पीठासमोर १६ एप्रिल रोजी ही सु ुनावणी होईल. या कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या अनेक याचिका न्यायालयात दाखल झाल्या आहेत.

**<><><><>**

अमेरिकेत लॉस एंजेलिस इथे होणाऱ्या २०२८च्या ऑलिंपिक क्रीडा स्पर्धांमध्ये क्रिकेटचा समावेश होणार आहे. आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीच्या कार्यकारी मंडळाने काल याची घोषणा केली. ऑलिंपिकमध्ये २० षटकांचे सामने होणार असून त्यात पुरुष आणि महिलांच्या स्पर्धेत प्रत्येकी सहा संघ सहभागी होणार आहेत. प्रत्येक संघ प्रत्येकी १५ खेळाडू खेळवू शकणार आहे. मात्र, अद्याप यासाठी स्टेडियमच्या नावांची यादी ठरवण्यात आलेली नाही.

**<><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात बेंगळुरुच्या एम. चिन्नास्वामी स्टेडिअमवर सामना होणार आहे. सामन्याला संध्याकाळी साडेसात वाजता सुरुवात होईल. दिल्ली कॅपिटल्स सलग तीन सामने जिंकत सहा गुणांसह गुणतालिकेत तिसऱ्या स्थानी आहे. तर रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु चौथ्या स्थानी आहे.

दरम्यान कालच्या सामन्यात गुजरात टायटन्सनं राजस्थान रॉयल्सचा ५८ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना गुजरातने २० षटकांत ६ बाद २१७ धावा केल्या. प्रत्युत्तरात, २१८ धावांचा पाठलाग करताना राजस्थान रॉयल्सचा संघ १९ षटक २ चेंडूत १५९ धावांत गारद झाला. सामन्यादरम्यान

षटकांची गती न राखल्याबद्दल राजस्थानचा कर्णधार संजू सॅमसनला २४ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

<><><><>

चीनमध्ये निंगबो इथं सुरु असलेल्या आशियाई बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत भारताची मिश्र जोडी ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो यांनी उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. त्यांनी चीनी तैपेईच्या हाँग वेई ये आणि निकोल गोंझालेस चान यांचा १२-२१, २१-१६, २१-१८ असा पराभव केला. तसंच आशिथ सूर्या आणि अमृता प्रमुथेश या जोडीचा उपउपांत्यपूर्व फेरीत पराभव झाला.

महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत पी.व्ही. सिंधूला जपानच्या अकाने यामागुची कडून ११-२१, २१-१६, १६-२१ असा पराभव पत्करावा लागला. पुरुष एकेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत भारताच्या किरण जॉर्जला देखील थायलंडच्या कुनलावुत विटिडसारनकडून २१-१९, १३-२१, १६-२१ असा पराभव पत्करावा लागला.

<><><><>

तिरंदाजी विश्वचषक स्पर्धा २०२५ च्या पहिल्या टप्प्यात पुरुषांच्या संयुक्त सांघिक क्रीडाप्रकारात भारतानं कांस्य पदक पटकावलं आणि भारताच्या खात्यात पहिलं पदक जमा झालं. अभिषेक वर्मा, ऋषभ यादव आणि ओजस देवताळे यांच्या संघानं काल अमेरिकेतल्या ऑबर्नडेल इथं झालेल्या कांस्यपदकाच्या सामन्यात डेन्मार्कचा २३०-२२३ असा पराभव केला. भारतीय त्रिकुटानं उपांत्यपूर्व फेरीमध्ये ग्वाटेमालाचा २२०-२१८ असा पराभव केला होता, परंतु उपांत्य फेरीत इटलीकडून त्यांना थोड्या फरकानं पराभव पत्करावा लागला.

<><><><>

टेनिसमध्ये, रोहन बोपण्णा आणि बेन शेल्टन यांनी मोंटे-कार्लो मास्टर्स स्पर्धेत पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. या इंडो-अमेरिकन जोडीनं तिसऱ्या

मानांकित इटालियन जोडी सिमोन बोलेली आणि आंद्रिया वावसोरी यांना एका रोमांचक सामन्यात २-६, ७-६, १०-७ असं पराभूत केलं. बोपण्णानं पाब्लो क्यूवास याच्यासोबत २०१७ मध्ये मोंटे-कार्लो मास्टर्स किताब जिंकला होता. पुरुषांच्या एकेरीत, चिलीच्या अलेजांद्रो ताबिलोनं दुसऱ्या फेरीत २४ वेळा ग्रँड स्लॅम विजेता नोवाक जोकोविचचा ६-३, ६-४ असा पराभव केला.

**<><><><><>**

डोमिनिक रिपब्लिक या देशाच्या राजधानीत, सॅन्टो डोमिंगो इथे एका नाईट क्लबचं छत कोसळून झालेल्या अपघातातल्या मृतांचा आकडा १८४ झाला आहे. आपत्कालीन पथकांमार्फत बचावकार्य सुरु आहे आतापर्यंत १४५ जणांना वाचवण्यात आलं आहे.

**//<><><><><>//**